सन २०१७-१८ या वर्षात वसंतराव नाईक राज्य कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था , नागपूर व तिच्या सात संलग्न विभागीय कृषि विस्तार प्रशिक्षण संस्थाकरिता मंजूर अर्थसंकल्पीत तरतूदीस प्रशासकीय मान्यता व मंजूर निधी वितरणास मान्यता.

# महाराष्ट्र शासन

**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०१८/प्र.क्र. ७२/३-अे**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

**दिनांक : ०५ मार्च, २०१८**

**संदर्भ-**

१) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग, क्रमांक : संकीर्ण २०१७/ प्र.क्र.९१/३-अे, दि. १५.०९.२०१७

२) शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांक: अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थसंकल्प-३, दि.०६.०२.२०१८

**प्रस्तावना :-**

उपरोक्त संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयान्वये सन २०१७-१८ मध्ये वसंतराव नाईक राज्य कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, नागपूर व तिच्या सात संलग्न विभागीय कृषि विस्तार प्रशिक्षण संस्थाकरिता अर्थसंकल्पीत करण्यात आलेल्या रु. ५०.०० लक्ष एवढया निधीस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती तसेच वित्त विभागाच्या दि. ३०.६.२०१७ परिपत्रकानुसार सदर योजनेसाठी अर्थसंकल्पीत करण्यात आलेल्या रु. ५०.०० लक्ष एवढया तरतुदीपैकी ७०% निधी रु. ३५.०० लक्ष आयुक्त ( कृषि ) यांना वितरित करण्यास शासन मान्यता देण्यात आली होती. आता उपरोक्त संदर्भ क्र. २ येथील वित्त विभागाच्या शासन परिपत्रकानुसार विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानूसार सन २०१७-१८ करिता वसंतराव नाईक राज्य कृषि व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, नागपूर (२४०१ २६४९ ) गौण बांधकाम या योजनेंतर्गत रु. ५०.०० लक्ष च्या ८०% म्हणजेच रु. ४०.०० लक्ष तरतूद ( २४०१ २६४९ ) या लेखाशिर्षाखाली कृषि आयुक्त कार्यालयास वितरीत करणे आवश्यक आहे. तथापि यापुर्वीच रु. ३५.०० लक्ष तरतूद ( २४०१ २६४९) या लेखाशिर्षाखाली कृषि आयुक्त कार्यालयास उपरोक्त संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयाअनव्ये वितरीत करण्यात आली आहे. सबब वित्त विभागाने त्यांच्या दि. ६.२.२०१८ च्या परिपत्रकान्वये विभागास प्रदान केलेल्या अधिकारानूसार वनामती, नागपूर व तिच्या सात संलग्न विभागीय कृषि विस्तार प्रशिक्षण संस्थाच्या गौण बांधकामासाठी सन २०१७-१८ करिता रु. ५.०० लक्ष एवढी तरतूद वितरीत करणे आवश्यक आहे. तदनूसार शासन पुढील प्रमाणे निर्णय घेत आहे .

**शासन निर्णय :-**

सन २०१७-१८ मध्ये वनामती, नागपूर व तिच्या सात संलग्न विभागीय कृषि विस्तार प्रशिक्षण संस्थाच्या गौण बांधकामासाठी रु. ५.०० (अक्षरी रुपये पाच लक्ष फक्त) इतका निधी मागणी क्र. डी- ३, २४०१, पीक संवर्धन, १०९ विस्तार व प्रशिक्षण, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-राज्य योजनातंर्गत योजना (०१) (४७) वसंतराव नाईक राज्य कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, (२४०१ २६४९) ३१-सहाय्यक अनुदान या लेखाशिर्षखाली आयुक्त (कृषि) कार्यालयास वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. प्रत्यक्ष निधी खर्चासाठी उपलब्ध करताना वित्त विभागाच्या संदर्भाधीन क्र. २ च्या परिपत्रकातील अटी व शर्तीचे पालन करावे व याबाबत खात्री करुन तसे प्रमाणित करावे व त्यानंतर प्रत्यक्ष निधी खर्चासाठी उपलब्ध करण्याची जबाबदारी संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांची राहील.

३. मंजुर केलेला रु.५.०० लक्ष (अक्षरी रूपये पाच लक्ष फक्त) निधी खर्च करण्यास संचालक (आत्मा), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. संचालक (आत्मा), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी मंजूर केलेला निधी वसंतराव नाईक राज्य कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, (वनामती) नागपूर यांचेकडे हस्तांतरित करण्याबाबतची कार्यवाही करावी.

४. वसंतराव नाईक राज्य कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, नागपूर आणि तीच्या संलग्न कृषि विस्तार प्रशिक्षण संस्थाची बांधकामे, अनुषंगीक बाबी इत्यादीकरिता सातत्याने पाठपूरावा करून कामे पुर्ण करून घेण्याची यामध्ये मुख्यत्वे करून महिलांची वसतीगृहे याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाकडे निधी वर्ग करण्याची व प्रस्तावित बांधकामाची कामे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करवून घेण्याची तसेच निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र संचालक (आत्मा) कृषि आयुक्तालय, पुणे यांना वेळीच सादर करण्याची जबाबदारी संचालक, वसंतराव नाईक राज्य कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था (वनामती), नागपुर यांची राहिल. संचालक (आत्मा) कृषि आयुक्तालय, पुणे यांनी सदर कार्यक्रमाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने सविस्तर मार्गदर्शक सूचना निर्गमित कराव्यात व प्रस्तुत कार्यक्रमांतर्गत यापुर्वी वितरीत निधीच्या अंतर्गत झालेल्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनाकडे सादर करण्याची कार्यवाही करावी.

५. हे आदेश वित्त विभागाने संदर्भाधीन क्रमांक.२, दिनांक-६/२/२०१८ च्या परिपत्रकान्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३०५११२००६९००१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Chandrakumar Vithal Ghaytadak

Digitally signed by Chandrakumar Vithal Ghaytadak
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=034948ccd1f6b6c67380c817b34a9af75fcfa67 9a4609321f9da27d9ab87b0d1, cn=Chandrakumar Vithal Ghaytadak
Date: 2018.03.05 11:51:19 +05'30'

**(चं.वि.घायतडक)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा. मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.
२) मा. राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.
३) आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे-१.
४) संचालक (आत्मा), तथा कृषि नोडल अधिकारी, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे. (१० प्रती)

५) संचालक, वसंतराव नाईक राज्य कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, नागपूर.
६) व्यवस्थापक संचालक, महाराष्ट्र राज्य वियाणे महामंडळ, अकोला.
७) व्यवस्थापक संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि उद्योग विकास महामंडळ, मुंबई.
८) सर्व मा. विधान सभा / विधान परिषद सदस्य
९) सर्व संचालक/सहसंचालक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०) प्राचार्य, विभागीय कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, खोपोली, ता. खानापूर, जि. रायगड.
११) प्राचार्य, विभागीय कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, गेट क्रमांक ४, शहाजी नगर, लाईन,बाजार कोल्हापूर.
१२) प्राचार्य, विभागीय कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, बुलडोजर युनिट, शिवाजी नगर, पोस्ट ऑफीस, जवळ, च-होली, पुणे.
१३) प्राचार्य, विभागीय कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, संभाजी चौक, उंटवाडी रोड, नाशिक.
१४) प्राचार्य, विभागीय कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, शहानुर मिया, दर्गा रोड, औरंगाबाद.
१५) प्राचार्य, विभागीय कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, तपोवन रोड, अमरावती.
१६) प्राचार्य, विभागीय कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, बंगला क्रमांक ६२/१, धरमपेठ, व्ही. आय. पी. रोड, सीव्हील  लाईन, नागपूर.
१७) विभागीय कृषी सह संचालक (सर्व),
१८) कृषि सहसंचालक, (विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१९) जिल्हा अधिक्षक, कृषि अधिकारी (सर्व).
२०) महालेखापाल-१, महाराष्ट्र (लेखा परिक्षा/ लेखा अनुज्ञेयता), मुंबई.
२१) महालेखापाल-२, महाराष्ट (लेखा परिक्षा/ लेखा अनुज्ञेयता), नागपूर.
२२) सहसंचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासकीय भवन, ५ वा मजला, मंत्रालय,मुंबई.
२३) जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व), बृहन्मुंबई व मुंबई उपनगर हे जिल्हे वगळून.
२४) जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व), बृहन्मुंबई व मुंबई उपनगर हे जिल्हे वगळून.
२५) वित्त विभाग (व्यय-१/अर्थसंकल्प-१३), मंत्रालय, मुंबई-३२.
२६) अवर सचिव, कार्यासन २-अे, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
२७) निवड नस्ती कार्यासन ३-अे.